
NEHRU
BAL PUSTAKALAYA

# प्राणिसंग्रहालयात

रस्किन बाँड







ISBN 81-237-2704-6

पहिली आवृत्ती 1985 (शके 1907)
सहावे पुनर्मुद्रण 1999 (शके 1921)
© रस्किन बाँड, 1974
Who's Who at the Zoo *(Marathi)*

**रु. 8.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5, ग्रीन पार्क
नवी दिल्ली 110016 यांनी प्रकाशित केले.

नेहरू बाल पुस्तकालय

# प्राणिसंग्रहालयात

रस्किन बाँड

चित्रे व सजावट: रघु राय

अनुवाद: दीपक कुमार

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# छानदार हॉटेल


आजचे जग आहे धकाधकीचे, भाऊगर्दीचे ! जंगले झपाटयाने नाहीशी होत आहेत आणि त्याच बरोबर असंख्य पशु-पक्ष्यांचा अन्न-निवारा दिवसें दिवस तुटत चालला आहे. त्यांच्यातल्या कित्येक जातींचे पशु-पक्षी तर अगोदरच नामशेष झाले आहेत. बाकीच्यांच्यासाठी प्राणिसंग्रहालय हेच बहुधा अखेरचे आश्रयस्थान असावे.

वन्य प्राण्यांचे संरक्षण हे काही प्राणिसंग्रहालयाचे काम नव्हे. ते तर प्राण्यांच्या कळपासाठी राहण्या जेवण्याची सोय असलेले एखाद्या छानदार हॉटेल सारखे असते. अभयारण्यात वन्य प्राण्यांच्या संरक्षणाचे काम अधिक चांगल्या रीतीने होते. प्राणिसंग्रहालयाचे काम म्हणजे प्राण्यांची व माणसांची गाठ घालून देणे. त्यामुळे आम्हाला जगाच्या व देशाच्या निरनिराळया भागातील कितीतरी पशुपक्षी जवळून पाहता येतात. त्यांचे सौंदर्य, त्यांची वैशिष्टये टिपता येतात. त्यांच्या विशिष्ट लकबी न्याहाळता येतात. प्रत्येकालाच काही काझीरंगाच्या अभयारण्यात जाऊन गेंडा पाहणे किंवा गीरच्या जंगलात जाऊन सिंह पाहणे जमत नसते. पण दिल्लीच्या कोणत्याही शाळकरी पोराला सुद्धा हे प्राणी बघायला मिळतात. ते कुठे ? तर प्राणिसंग्रहालयात ! तसेच दक्षिण अमेरिकेच्या घनदाट अरण्यांत जाऊन बिबळया वाघाची किंवा लाल तोंडी माकडाची भेट घेणेही काही प्रत्येकालाच शक्य नसते. पण दिल्ली, अहमदाबाद, जयपूर, मुंबई, लखनौ किंवा इतरत्र ज्या ज्या ठिकाणी प्राणिसंग्रहालय आहे त्या त्या ठिकाणी हे प्राणी आणि दुसरेही अनेक मजेदार प्राणी बघता येतात.

प्राणी रानात असताना ज्या नैर्सगिक वातावरणात राहतात तशाच वातावरणात त्यांना ठेवण्यासाठी जी प्राणिसंग्रहालये झटतात ती सर्वांत उत्तम समजली जातात. कितीही म्हटले तरी प्राण्यांना देखील माणसासारखीच सुख दु:खे असतात आणि एखाद्या वन्य प्राण्याला त्याला अजिबात हालचाल करता येणार नाही इतक्या छोटयाशा पिंजऱ्यात डांबून ठेवले तर त्याला अतिशय दु:ख नाही का होणार ? आशियातील सर्वांत मोठे प्राणिसंग्रहालय दिल्लीला आहे. ते नुसते मोठेच नाही तर जगातील सर्वोत्कृष्ट प्राणिसंग्रहालयात त्याची गणना होते. तेथे पक्ष्यांच्या वसाहतीसाठी भरपूर पाणी आहे; हरणांसाठी विस्तीर्ण बाग आहे. वाघासाठी गुहा आहेत, चित्त्यासाठी वृक्ष आहेत आणि जेथे पिंजऱ्यांची गरज आहे तेथे मोठे व स्वच्छ पिंजरे आहेत.

हे एक नमुनेदार प्राणिसंग्रहालय आहे. माण-सांसाठी असलेल्या उत्तम दर्जाच्या हॉटेल-सारखे ! म्हणूनच तर, पक्ष्यांच्या नगरीतले कित्येकजण स्वत:हून तेथे येऊन राहिले आहेत.

प्राण्यांविषयी माहिती मिळवण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे त्यांचे निरीक्षण करणे हा होय. मी या पुस्तकात एवढेच फक्त कर-णार आहे की प्राणिसंग्रहालयातल्या काही प्राण्यांशी तुमची ओळख करून देणार आहे. त्यापैकी वाघ व हत्ती सारखे काही प्राणी खूप प्रसिद्ध आहेत तर प्रचंड मॅन्ड्रिल वानरे आणि झेब्रा सारखे काही प्राणी अनोळखी आहेत. अर्थात सर्वांचाच या ठिकाणी समाचार घेणे शक्य नाही. जगातील सर्व प्राण्यांची यादी देऊन त्यांची वैशिष्टये सांगायची म्हटले तर त्यासाठी मला मोठा ग्रंथच लिहावा लागेल. तसे करायचा विचार चांगला आहे. पण जगातील सर्व प्राण्यांचा एका छोटयाशा यादीत समावेश करता आला तर तो प्राणि-सृष्टीच्या दृष्टीने मोठा दुर्दिनच म्हणावा लागेल.






# करकोचा


तुम्ही कधी भारतातल्या एखाद्या खेडयात वा खेडयाजवळ राहिला असलात तर क्षत्र-बलाक करकोचा तुमच्या नजरेस पडला असेल. या लांबटांग्या पक्ष्याला गावा बाहेरच्या मोकळया पाणथळ जागेत राहणे फार आवडते. तुम्हाला कदाचित माहीत असेल, हा करकोचा जणू सैनिक अधिकारी असतो. सैनिकी पद्धतीच्या त्याच्या रुबाबदार चालीमुळे त्याला ॲडज्यूटण्ट हे इंग्रजी नाव मिळालेले आहे.

या करकोच्याला सुरेख फुलारलेली पिसे असतात. तुळतुळीत मोठे डोके आणि लांब पाय असतात. अधिकारी पदाला शोभून



दिसेल असाच तो सुंदर असतो. त्याची चोच चांगली मजबूत असते आणि त्या चोचीने तो ससा किंवा कोंबडया इतका मोठा प्राणी सुद्धा मटकावू शकतो. तो अतिशय उपयोगी असतो. कारण गिधाडांप्रमाणेच तो देखील खेडयातील रस्त्यांवरची घाण स्वच्छ करतो आणि सापांचा व सरडयांचा नायनाट करतो.

करकोचा पाळणे सोपे आहे. त्याची चालण्याची ढब आणि त्याच्या मजेदार सवयी छान मनोरंजन करतात. माझ्या आजोबांना प्राणी पाळायची खूप आवड होती. एकदा त्यांच्यापाशी एक करकोचा होता. आजोबा जेवायला बसले म्हणजे तो त्यांच्या खुर्चीच्या मागे उभा राहायचा आणि त्यांच्या पानातील पदार्थ उचलून गट्ट करायचा.




काही लेखकांनी या करकोच्याला कुरूप पक्षी म्हटले आहे. कारण त्याची चोच बोजड दिसते आणि त्याच्या मनोपाशी एक लांबलचक पिशवी लोंबत असते. पण सौंदर्याविषयी प्रत्येकाच्या वेगवेगळया कल्पना असतात आणि मला तरी हा पक्षी देखणा वाटतो. शिवाय हा पक्षी अबोल स्वभावाचा आहे (त्याला स्वरयंत्रच नसते) जबडयाने त्याला थोडाफार गोंगाट तेवढा करता येतो. तो प्रेमात पडला म्हणजे मात्र हलक्या आवाजात रे रे असा आवाज काढतो.

हे करकोचे भारतात सर्वत्र आढळतात (ज्या ज्या ठिकाणी पाणी आहे) पण तुम्ही जर शहरात राहात असाल तर मात्र तो बघण्यासाठी प्राणिसंग्रहालयातील पक्ष्यांच्या विभागात तुम्हाला जावे लागेल. त्याच ठिकाणी तुम्हाला त्याचा स्पूनबिल नावाचा नातेवाईकही भेटेल. आकाराने हा तितकासा मोठा नसतो पण चमच्यासारखी काळी चोच त्याला असते आणि त्या चोचीने तो पाण्यातले कृमिकीटक मोठया हुशारीने पकडतो.

# काळवीट

शंभर वर्षांपूर्वी या प्राण्याचे हजार हजारचे कळप पंजाब, उत्तर प्रदेश आणि राजस्थानात सहज पहायला मिळायचे. पण हल्ली मात्र यांचे वीस पंचवीसचे कळप देखील क्वचितच दृष्टीस पडतात. हे मैदानी प्रदेशात राहातात. तेथे लोकांची वस्ती व शेती भाती असली तरी ह्यांना चालते. पण हे पिकांची नासाडी करतात म्हणून लोक यांना जवळ फिरकू देत नाहीत.

काळवीटापैकी नराला फक्त शिंगे असतात. चिंकारा किंवा भारतात आढळणाऱ्या इतर हरणांपेक्षा यांची शिंगे बरीच लांब असतात. बहुधा दोन फुटांपर्यंत त्यांची लांबी असते. ती सरळ वरच्या दिशेला वाढतात



आणि त्यांना नागमोडी वळण असते. सुंदर शिंगे आणि आकर्षक रंग यामुळे काळवीट इतका अप्रतिम दिसतो की या बाबतीत दुसरा कुणीही प्राणी त्याचा हात धरू शकत नाही.

हरणांच्या अन्य जातींप्रमाणेच काळवीट देखील रवंथ करतात. म्हणजेच ते गवत किंवा अन्य जे काही खाद्य मिळेल ते न चावताच गिळून टाकतात आणि मग स्वस्थपणे ते खाल्लेले अन्न पुन्हा तोंडात आणून दाढांनी चावून चावून त्याचा लगदा करतात. माणसे जात्याने धान्य दळण्याचे काम करतात तसेच काम या दाढा करतात. या पद्धतीने आहार घेणाऱ्या प्राण्यांना रवंथ करणारे प्राणी म्हणतात. या प्राण्यांना बहुधा स्वतःच्या बचावाचे साधन नसते. इतर पशूंच्या भक्ष्यस्थानी पडायची भीती त्यांना असते. म्हणून एकाच जागी त्यांना जास्त वेळ टिकून राहाता येत नाही. त्यामुळे थोडया वेळात जास्तीत जास्त जितके गवत खाऊन घेता येईल तितके ते खाऊन घेतात आणि मग लपण्याच्या जागी जाऊन संथपणे रवंथ करीत बसतात.



# चिपांझी

चिंपांझीला जर आपण या पुस्तकातून वगळले तर त्याच्यावर मोठाच अन्याय केल्यासारखे होईल. आपण बबून या मोठ्या वानराची दखल घेतली आहे. चिंपांझी हा त्या बबूनपेक्षा नक्कीच खूप सुधारलेला असतो. इतका की प्राण्यांमध्ये त्याची गणना करणे कदाचित योग्य ठरणार नाही. आज जगात उपलब्ध असणाऱ्या सर्व मनुष्य सदृश्य प्राण्यांमध्ये त्याचे माणसाशी सर्वांत अधिक साम्य आहे आणि त्याच्या मनात कदाचित येत असेल की, 'तुम्ही जर मला तुमच्या प्राणिसंग्रहालयात ठेवणार असाल तर तुम्ही सुद्धा तिथं रहायला काय हरकत आहे ?'


चिंपांझीला माणसांमध्ये रहायला आवडते हे खरे आहे. जंगलच्या हीरोचा, टारझनचा तो जिवश्च मित्र आहे फार काय, टारझनच्या सिनेमांतून काम करणाऱ्या कित्येक चिंपांझींनी आपले काम इतके समजून उमजून केले आहे की टारझनचे काम करणाऱ्या माणसांनाही त्यांनी माग टाकले आहे.

चिंपांझीचे वयही साधारणपणे माणसा इतकेच असते. म्हणून नऊ वर्षांचा चिंपांझी नऊ वर्षांच्या मुलाचा छान मित्र होऊ शकतो. त्यांच्यात साम्यही बरेच असते.


जेराल्ड डरेल हा लेखक प्राणिसंग्रहालयासाठी जगातून प्राणी जमवतो. एकदा त्याने एक चिंपाझी पाळला होता. तो चहाच्या वेळेला, जेवायच्या वेळेला आणि जेवणानंतर सिगारेट ओढायच्या वेळेला देखील त्याला सोबत करायचा. तो चिंपांझी मोठया मजेत नाकातोंडातून धूर सोडायचा. चिंपांझींना थंडी आवडत नाही. कपडयांचे मूल्य ओळखायला ते चटंकन शिकतात. एका चिंपांझीला तर नव्या कपडयांची इतकी हौस होती की त्याला ज्या ज्या वेळी नवे कपडे दिले जात, त्या त्या वेळी जुन्या कपडयांच्या, ते पुन्हा वापरायला लागू नयेत म्हणून तो लगेच फाडून चिंध्या करायचा. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, रानावनातून राहताना देखील चिंपांझींना झाडापेक्षा जमिनीवर वावरणेच अधिक

आवडते. त्यामुळे ते अगदी सहज चित्याच्या तावडीत सापडत असतील (माकडांना नेहमी याची भीती वाटते) असे कुणाला वाटेल. पण कळपात राहाण्यात या वानरांना सुरक्षितता वाटते शिवाय ते विलक्षण ताकदवान असतात. त्यांचे हात पाय लांब, मोठे व बळकट असतात. त्यांचे खरे घर म्हणजे पश्चिम आफ्रिका. पण त्यांना जर संयुक्त राष्ट्रसंघात जागा दिली तर ती जागाही ते खुषीने पत्करतील.









# काकाकुवा

बहुतेक प्राणिसंग्रहालयांतून एक किंवा दोन तरी काकाकुवा असतातच. कैदेतही ते मजेत राहू शकतात. पिंजरे मात्र अगदीच लहान असता कामा नये. मूळचे ते ऑस्ट्रेलियाचे. त्यांचा रंग पांढरा शुभ्र असतो आणि डोक्यावर एक छानदार तुरा असतो. काही पांढरे शुभ्र असले तरी त्यांच्या गालावर, छातीवर आणि पंखांखाली गुलाबी छटा असते आणि त्यांचा तुरा लाल व पिवळ्या पट्टयापट्टयांचा असतो. काळ्या मोठ्या काकाकुवांचा रंग करडा असतो. त्यांचे गाल फिक्कट लाल रंगाचे असतात आणि त्यांचा तुरा लांब काळ्या पिसांचा असतो.

काकाकुवा आपले भरपूर मनोरंजन करतात. त्यांच्या हालचाली मोठ्या गमतीशीर असतात. त्यांच्याकडे लक्ष दिलेले आणि त्यांची प्रशंसा केलेले त्यांना आवडते. आपलेच नाव ते पुन्हा पुन्हा उच्चारतात पण जर का तुम्ही त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही तर मात्र ते तुमच्यावर ओरडायला सुरुवात करतात.

पोपटाच्या जातीच्या इतर पक्ष्यांप्रमाणे त्यालाही आपल्या तीक्ष्ण चोचीला व्यायाम द्यायला आवडते आणि पुढयात येणाऱ्या लाकडाच्या प्रत्येक लहान तुकडयाचा चोचीने कीस पाडण्यात त्याला गंमत वाटते. त्याची चोच जरी इतकी धारदार असली तरी इजा न करता कुणाच्याही हातावर किंवा तोंडावर तो सहज चढू शकतो. पण ओळखदेख नसलेल्याचा स्पर्श त्याला मुळीच आवडत नाही. म्हणून तुम्ही कधीही त्याच्या पिंजऱ्यात हात घालू नका. नाहीतर तो तुमच्या बोटांचा कडकडून चावा घेईल.

आजोबांपाशी असलेला एक काकाकुवा तर घरच्या सर्व लोकांना ओळखायला शिकला होता आणि बहुधा तो सर्वांना त्यांच्या नावाने बिनचूक हाक मारायचा. या बाबतीत तरी मला वाटते "गंगाराम" वगैरे पोपटपंची करणाऱ्या आपल्या नेहमीच्या पोपटांपेक्षा तो जास्त हुशार आहे.



# मगर

मगराच्या तोंडावरचे हास्य तुम्ही कधी पाहिले आहे ? ती भक्ष्य खाण्यासाठी जबडा वासते तेवढा वेळ सोडता बाकी सदोदित ते तेथे असते.

प्राणिसंग्रहालयातली मगर आळशी वाटते. पण ती नेहमी तशीच दिसते. रानावनात असली तरी नदीकाठी सुस्तपणे पडून रहायची घाणेरडी सवय तिला असते. त्यावेळी ती जुन्या झाडाच्या खोडासारखी दिसते.

मगरीला ताज्या मांसापेक्षा कुजलेले मांस आवडते. आपली शिकार ती बहुधा मस्तपैकी तयार होईपर्यंत म्हणजे पुरेशी सडून वास मारीपर्यंत पुरून ठेवते. या सरपटणाऱ्या प्राण्याच्या तावडीत सापडलेल्या माणसांनी आपले भयंकर मरण चुकवण्यासाठी मेल्याचे ढोंग करून स्वत:ला पुरू दिल्याचे आणि मग त्या भुशभुशीत थडग्यातून बाहेर पडून धूम ठोकल्याचे ऐकिवात आहे.

भारतात काही ठिकाणी दलदलीतील मगर पवित्र समजतात. प्राचीन इजिप्तमध्ये देखील एका मगर देवतेची पूजा करीत असत. गंगेतील मगरींना 'घडियाल' म्हणतात. त्यांना लांब नाकाडे असतात आणि त्याच्या फटकाऱ्यांनी त्या मासे धरतात. आफ्रिका किंवा नाईल मधील मगर सर्वात सामान्य होय. पण ही देखील हल्ली दुर्मिळ होऊ लागली आहे. त्यास कारण म्हणजे मगरीच्या कातडीपासून बनवलेल्या बुटांची किंवा हँडबॅगेची फॅशन हे होय.


मगर जर जगातून नाहीशी झाली तर ते मोठे दुर्दैव ठरेल. कारण हा सर्वात प्राचीन सरपटणारा प्राणी आहे. पृथ्वीवर ज्यावेळी अगडबंब डाइनसॉअर प्राणी सरपटत असत त्यावेळी म्हणजे सुमारे वीस कोटी वर्षांपूर्वी पहिल्यांदा मगर अस्तित्वात आली. हल्लीची कवच व जाडजूड खवले असलेली मगर पाहिली म्हणजे तिचे आजच्या जगातील कुठल्याही प्राण्याशी नव्हे तर भूतलावरून नाहीशा झालेल्या त्या प्राण्याशी अधिक साम्य असल्याचे आढळते.

साधी मगर आणि दलदलीत राहाणारी मगर यांच्यात नाते असले तरी थोडा फरकही आहे. मोठया नद्यांत आणि अमेरिकेच्या दलदलीत राहाणाऱ्या या मगरी स्वभावाने मित्र्या असतात आणि त्यांच्या वाटेला कोणी गेले नाही तर त्याही कोणाच्या वाटयाला जात नाही.

# हत्ती

भारतात आपल्याला जयपूर किंवा म्हैसूरच्या रस्त्यांवर अगदी सहज हत्ती पाहायला मिळत असला तरी हत्ती खेरीज कोणतेही प्राणिसंग्रहालय पूर्ण होत नसते. हत्ती सर्वांनाच आवडतात. तुम्ही कोठेही गेलात तरी या अवाढव्य प्राण्याविषयी एकही वावगा शब्द तुमच्या कानावर येणार नाही. बळ आणि मृदुपणा, बालिश रुसवा आणि झक्क-पैकी थट्टेखोर वृत्ती; प्रचंड वजन आणि नर्तिकेचा नाजुक समतोलपणा या सर्वांचा सुंदर मिलाप हत्तीमध्ये आढळतो.

हिंदू आणि बौद्ध लोकसाहित्याचा हत्ती हा मोठा आवडता विषय आहे. सर्वत्र तो मोठ्या आपुलकीच्या नजरेने पाहिला जातो. हत्तीचा माहूत त्याला जशी सुरेख नावे देतो तशी नावे अन्य प्राण्यांना मिळाल्याचे क्वचितच आढळते. उदाहरणार्थ, मोती, कमल, काळा नाग, सोनेरी इत्यादी. हत्तीणीला नाव देताना पियारी—लाडकी हे विशेषण बहुधा



आणखी जोडतात.

या प्राण्यांना इतका मान देण्याचे कारण काय ? उत्तर शोधून काढणे काही कठीण नाही. हत्ती बुद्धिमान, कष्टाळू आणि आज्ञाधारक असतात. त्यांना माणसे आवडतात. माणसांच्या सवयीप्रमाणे ते चटकन स्वत:ला तसे वळण लावून घेतात (या ठिकाणी मी आफ्रिकेतील नव्हे तर भारतीय हत्तीविषयी

बोचतोय. आफ्रिकेतील हत्तीच्या हस्तिदंताने त्यास दुर्दैवी शिकार बनवून टाकले आहे) हत्ती प्रेमाची परतफेड करतात ते चलाख आणि बलवान असतात शिवाय पहायला मजेशीर असतात ते सांगायला नकोच. म्हणूनच या पुस्तकात मी त्यांच्यासाठी थोडी जास्त जागा अडवली तर त्यात वावगे काहीच नाही. त्याला सर्वात जास्त जागा लागते आणि तो सर्वांचा आवडता आहे.

भारतात अजूनही रानटी हत्ती अस्तित्वात असले तरी हत्ती हा आता जवळ जवळ पाळीव प्राणी बनला आहे. रानटी हत्तींना पकडण्याचे काम बहुधा माणसाळलेले हत्ती करतात. आपल्या या नातेवाईकामध्ये लगेच सुधारणा घडवून आणण्यासाठीही तेच झटतात. पण हत्तीच्या वर्तणुकीच्या बाबतीत मात्र भरवसा धरता येत नाही. पुरात अडकून पडलेल्या गावकऱ्यांची सुटका करताना मी एका हत्तीला पाहिले आहे. पण दुसऱ्या एका प्रसंगी तोच हत्ती इतका बिथरला की त्याने गावची टपाल कचेरीच पार तुडवून टाकली.

हत्ती पाळणे अतिशय खर्चाचे आहे. पूर्वीच्या काळी राजे लोकच काय ते हत्ती बाळगीत. या राजांच्या पदरी हत्तींवर देखरेख करण्यासाठी बरेचसे लोक नेमलेले असत. हत्तीसाठी असलेल्या नोकरांच्या या लवाजम्यामुळेच एक म्हण आहे की "हत्तीच्या पदचिन्हात असख्य पाऊलखुणा असतात."

गणराज्य दिनाच्या परेड सारख्या समारंभाच्या प्रसंगी अजूनही हत्ती सजवून मिरवण्यात येतो. हत्तीचा माहूत त्याला खाली पडायला लावतो. मग इशाऱ्यासरशी डोके किंवा पाय वर करायला लावून मुलासारखो त्याला आंघोळ घालतो. माहूताचा छोटा मुलगा त्याच्यावर चढून विटेने त्याला खसखसून काढतो. कधी कधी हत्ती चहूबाजूंना पाणी उडवीत साबणाच्या फेसाळ पाण्याने खेळतो.

आंघोळ संपली की त्याला तयार करण्यात येते. अगोदर गंडस्थळ, सोंड आणि कानांवर मोठमोठया आकृत्या रंगवण्यात येतात. काही माहूत या कामात मोठे निपुण असतात. त्यानंतर हत्तीला बोचणार नाही अशा सुती दोरखंडानी हौदा त्याच्या पाठीवर आवळण्यात येतो. हा हौदा देखील खूप सजवलेला असतो.

हे सारे सोपस्कार हत्ती मोठया शांतपणे सहन करतो. पण कधी कधी हे सारे आटोपल्यावर तो खटयाळपणाही करतो. अचानक तो आजूबाजूची पाने आणि गवत उचलून आपल्या पाठीवर उधळतो आणि नेमकी परेड सुरू व्हायच्या आधी माहूताला धावपळ करायला लावतो.

हत्तीचे खास उल्लेखनीय वैशिष्टय बहुधा त्याची सोंड असावे. सोंड म्हणजे एक लांब-

लचक नाकच. तुम्ही जर त्याची सोंड नीट तपासली तर तिच्या टोकाला नाकपुडया असल्याचे तुम्हाला दिसेल. इतर कोणत्याही प्राण्याच्या नाकाला वा नाकाडयाला असतात तशाच त्या असतात. आपण नाकाने श्वासोच्छ्वास करतो. तसाच हत्ती या सोंडेने करतो. पण सोंड नुसते नाकाचेच काम करीत नाही तर भरीला हाताचेही काम करते. सोंडने हत्ती जमिनीवरची वस्तू उचलून घेतो आणि झाडावरची पाने खुडतो. शिवाय सोंडने पाणी वर ओढून तो ते पितो. या साठी तो फक्त सोंडेचे टोक पाण्यात बुडवतो आणि श्वास वर ओढतो. नंतर तो सोंड वळवून नाकपुडया उघडया तोंडासमोर आणतो आणि श्वास बाहेर सोडून ते पाणी नाकपुडयांवाटे तोंडात टाकतो. काय अजब आहे ही सोंड !



# जिराफ

आफ्रिकेतच काय तो हा सुंदर प्राणी आढळतो. युरोपात हा सर्वप्रथम पाहावयास मिळाला तो थोर रोमन मुत्सद्दी ज्यूलियस सीझर (ख्रिस्तपूर्व 102 44) याच्यामुळे. त्याने रोममध्ये एका सर्कशीत हा दाखवला. त्यानंतर आणखी काही राजांनी या प्राण्यांचे प्रदर्शन केले. पाचव्या शतकात रोमच्या पतनानंतर 1827 सालापर्यंत एकही जिवंत जिराफ युरोपमध्ये नेण्यात आला नाही. त्या साली मात्र इजिप्तच्या पाशाने एक जिराफ इंग्लीश लोकांना आणि एक फ्रेंच लोकांना भेट दिला. तेव्हापासून आजपर्यंत अनेक जिराफ आफ्रिकेतून आणून जगभरातील अनेक प्राणिसंग्रहालयात ठेवण्यात आले आहेत.


पृथ्वीच्या पाठीवरील सर्व प्राण्यांमध्ये जिराफ हा सर्वांत उंच आहे. पूर्ण वाढ झालेला जिराफ सोळा ते सतरा फूट उंच असतो. लांबलचक मानेमुळे तो उंच झाडांच्या शेंडयां-पर्यंत सहज पोचू शकतो. शेंडयांवरची कोवळी पाने हाच त्याचा मुख्य आहार होय. त्याची जीभ मऊ आणि लांब असते. पाने आणि डहाळ्या तोंडापाशी ओढून घेण्यासाठी ती लांब वाढवता येते.

जिराफची चाल मोठी विचित्र असते. कारण एकाच वेळी तो एका बाजूचे दोन्ही पाय उचलतो. पण जिराफ धावतो मात्र खूप वेगाने त्याचे डोळे मोठे आणि हरणापेक्षाही सुंदर असतात. जिराफला दूरवर पाहाता येते. तसेच त्याचे घ्राणेन्द्रियही फार तीक्ष्ण असते. त्याच्या बाजूचा वारा वहात असला तर त्याला दूरवरच्या माणसाचा सुगावा लागतो. म्हणूनच वयात आलेल्या जिराफला पकडणे फार कठीण असते. त्यांच्या उंचीमुळे त्यांना एक जागेहून दुसरीकडे नेणेही त्रास-दायक असते. प्राणिसंग्रहालयातील जिराफां-पैकी बरेचसे लहान असतानाच पकडलेले असतात. प्राणिसंग्रहालयात जिराफ वाढतात. तेथे त्यांना मका, धान्य, गाजरे आणि गवत खाऊ घालतात.


जिराफ हा शब्द अरेबिक भाषेतील 'जिराफ' म्हणजे लांब मान यावरून आलेला आहे.



# गिनी पिग



छोटी छोटी सुंदर गिनी पिग डुकरे मुलांना नेहमीच आवडतात. डुकरांपेक्षा ती सशांसारखीच अधिक दिसतात. खरे तर, गिनी पिग हे नाव काहीसे चुकीचे आहे. कारण ती डुकरे नसतात तर उंदरासारखे कुरतडणारे प्राणी असतात आणि ती मूळची गिनी प्रदेशातील नसून दक्षिण अमेरिकेची आहेत. पण ती डुकरा सारखी डुर डुर करतात म्हणून कदाचित त्यांना डुक्कर समजण्यात येत असावे.



गिनी पिग बहुधा पाळण्यात येतात. भाजीपाला हे त्यांचे मुख्य खाद्य असते. ससे जे खातात तेच ते देखील खातात. पण त्यांना सर्वात जास्त आवड असते अजमोदा आणि गाजरांची. चहाची पाने आणि फळे देखील ते आवडीने खातात. त्यांच्या अंगावर आखूड व तकतकीत लव असते. तिचा रंग बहुधा गडद तपकिरी असून त्यावर काळे, पांढरे व पिवळे डाग असतात.

सशांप्रमाणेच गिनी पिग्जची वीण देखील फार लवकर होते. मादी वयाच्या दहाव्या महिन्यापासून पिले देऊ लागते. एका वेळी सहा ते आठ पिले होतात. जन्मापासून सहा आठवड्यांच्या आत पिले आईपासून मोकळी होऊन स्वतःचे पोट भरू लागतात आणि आई पुन्हा पिले द्यायला तयार होते.

# पाणघोडा

पूर्व आफ्रिका आणि कांगोच्या नद्यानाल्यांमधून हा प्राणी राहातो. दुसरा कुठलाही महाकाय प्राणी त्याच्या इतका ओंगळवाणा दिसत नसेल. खांद्यापाशी त्याची ऊंची जेम तेम चार फुटाच्यावर थोडी असते.



लांबीला तो अकरा ते चौदा फुटापर्यंत असतो. त्याचे वजन 5,000 ते 8,000 पौंड असते. त्याचे डोळे मोठे असतात. कान छोटे व मजेदार असतात आणि नाकपुडया अशा काही असतात की संपूर्ण शरीर पाण्याखाली असले तरी त्याला श्वास घेता येतो. पण लोकांना सर्वात जास्त जर कशाची गंमत वाटत असेल तर ती त्याच्या प्रचंड तोंडाची. त्याने जांभई देण्यासाठी तोंड उघडले म्हणजे त्याच्या तोंडातील जाडजूड गुलाबी मास आणि चकाकणारे दात दिसून येतात. सुळयाचे दात मोठाले असतात पण ते आतल्या बाजूला वळलेले असतात आणि तोंडाबाहेर दिसत नाहीत.

पाणघोडयाचा जबडा इतका मजबूत असतो की मगराचे कठीण कवच देखील तो फाडू शकतो. एक सबंध कलिंगड त्याच्या तोंडात अगदी सहज मावते, तुम्ही तोंडात बोर टाकता तसेच ! त्याची वृत्ती आक्रमकाची नसते. त्याने होडया उलटया पालटया करुन दातांनी त्यांचा चेंदामेंदा केल्याचे ऐकिवात येते ते खरे आहे. कधी-कधी तो चेंदा मेंदा ही करतो ! पण ज्यावेळी लहानगा पाणघोडा जवळपास असेल आणि खूपशा मगरी तेथे असतील तेव्हा ! पाणघोडयाची बाळे त्याच्या अवतीभवती असली की त्याला मगरींची खूप भीती वाटते. चिडलेला पाणघोडा नावेवर हल्ला करतो त्यास कारण म्हणजे ती नाव त्याला मगरीसारखी वाटते म्हणून.

पाणघोडा शाकाहारी असतो आणि त्याची भूकही जबरदस्त असते. दररोज सुमारे 200 ते 400 पौंड इतके खाद्य तो खाऊ शकतो. भरपूर आहार घेणाऱ्या अन्य विशाल प्राण्यांप्रमाणेच त्यांनाही आराम

करायला आवडते. संथ वाहाणाऱ्या नद्यांच्या पाण्यांत दिवसभर डुंबत राहून ते आराम करतात. पाण्याची त्यांची ही आवड आपल्या पाळीव म्हशींच्या हौशीच्या तोडीची आहे. म्हशीप्रमाणेच त्यांचे देखील आजूबाजूच्या वातावरणाकडे लक्ष नसते. फार काय त्यांच्या-वर उतरणाऱ्या करढोक आणि बगळयांकडेही ते दुर्लक्ष करतात. अधून-अधून ते भात्यातून निघाल्यासारखा विलक्षण आवाज काढतात, फुरफुरतात. मैलावरही त्यांचा तो आवाज ऐकू येतो.



# कांगारू

ऑस्ट्रेलिया, न्यू गिनी आणि त्या लगतच्या बेटांवर फक्त हा प्राणी आढळतो. कांगारूची उंची जवळ-जवळ माणसा इतकी असते. त्याचे मागचे पाय खूप लांब असतात. त्या पायांमुळेच तो एका खेपेत पंधरा फूटा इतक्या लांब उड्या मारू शकतो. त्याचे पुढचे आखूड पाय चालण्याच्या कामाचे नसतात तर उकरण्याच्या; वस्तू पकडण्याच्या



आणि अन्न तोंडात घालण्याच्या उपयोगाचे फक्त असतात. त्याचे शेपूट लांब, जाडजूड आणि बळकट असते. उडया मारताना आणि बसताना देखील तोल सांभाळण्यासाठी त्याचा उपयोग होतो. कांगारूचे डोके बरेचसे हरणासारखे असते आणि हरणासारखेच त्याला सुरेख, गोल, सौम्य डोळे असतात.

कांगारू शाकाहारी भोजन फक्त करतात. ते अतिशय भित्रे असतात आणि माणसापासून दूर पळतात. पण जर का कुत्र्यांनी हल्ला केला तर मात्र ते स्वसंरक्षणासाठी उभे ठाकतात. आपल्या मागच्या बळकट पायांनी व तीक्ष्ण पंजांनी ते आपला बचाव करतात.

लहानगी बाळे जोवर स्वतः आपली काळजी घेऊ शकत नाहीत तोवर आई त्यांना आपल्या पोटाशी असलेल्या पिशवीत ठेवून हिंडते. आई बरोबर जात असताना आपली तोंडे पिशवीबाहेर काढून गवत कुरडताना कधी-कधी हे लहानगे कांगारू दृष्टीस पडतात. पिशवी सोडून दिल्यावरही संकटाच्या वेळी ते बहुधा पिशवीकडे धाव घेतात.


पळताना पुन्हा-पुन्हा मागे वळून पाहाण्याची विचित्र सवय कांगारूंना असते. त्यामुळे काही वेळेला त्यांची झाडाला जोरदार धडक



बसते. पकडल्यावर कांगारू सहज माणसाळले जातात. मुळात कणखर प्राणी असल्याने प्राणिसंग्रहालयातही त्यांची चांगली वाढ होते.

कांगारूच्या कित्येक जाती आहेत. वृक्ष कांगारू, खडक कांगारू, जर्बोआ कांगारू (साधारणपणे ससाच्या आकाराचा) आणि कांगारू उंदीर.

# बिबटया




असे म्हणतात की मनी ही वाघाची मावशी आहे आणि तिने वाघाला झाडावर चढायचे सोडून बाकी सारे काही शिकवले. ते काही असो. बिबटया हा मनी मावशीच्या परिवारातील आहे आणि झाडावर चढायची विद्या अवगत करायला त्याने फारसा वेळा लावला नाही. त्याच्या याच गुणामुळे माकडांना त्याची फार भीती वाटते. बिबटया हा बहुतेक माकडांवर आणि कुत्र्यांवर ताव मारतो. संधी मिळाल्यास बोकडालाही सोडीत नाही.

भारतात आता वाघ खूप कमी झाले आहेत. पण बिबटे मात्र अजनही विपुल संख्येने आढळतात. हे प्राणी अतिशय सावध व धूर्त असतात. स्वतःला लपविण्याचे तंत्र त्यांनी पूर्णपणे आत्मसात केलेले आहे. ते मैदानी प्रदेशात तसेच डोंगराळ विभागातही राहू शकतात. वाघाला उंच वाढलेले गवत अधिक आवडते. पण त्यामुळे त्याला वारंवार मोकळया मैदानावर यावे लागते. बिबटया मात्र दाट राने पसंत करतो. त्याच्या अंगावरील ठिपकयांमुळे तो झाडावरील पानांमध्ये लपला असता चटकन ओळखू येत नाही.

काही लोकांच्या मते चित्ता आणि बिबटया हे वेगवेगळे प्राणी आहेत. पण ही एकाच प्राण्याची भिन्न-भिन्न नावे आहेत. बिबटयाच्या अंगावरची लव पिंगट पिवळसर असते आणि त्यावर सुंदर काळे ठिपके असतात. पण कधीकधी पूर्ण काळा बिबटयाही

दृष्टीस पडतो. भारतीय आणि आफ्रिकन जातीच्या बिबटया खेरीज दक्षिण अमेरिकेतील जग्वार बिबटया, आशियातील लांब केसाचा बिबटया, अमेरिकेतील पूमा बिबटया (यालाच कूगार असेही म्हणतात),, अमेरिकेच्या उष्णकटिबंधातील ओसेलॉट आणि इंडोनेशियातील रिमनदहन या बिबटयांच्या आणखी काही जाती होत. यातल्या अखेरच्या जातीला सावळा बिबटया किंवा कासवाच्या कवचाचा बाघ असेही म्हणतात. कारण त्याच्या अंगावर बिबटया सारखे ठिपकेही असतात आणि वाघासारखेपट्टे ही असतात.

भारतातील विख्यात चित्ता वा शिकारी बिबटया हल्ली नामशेष झाला आहे.



# सिंह

बिबटयाला झाडांवर सहज चढता येते, वाघ कसेबसे चढतो, आणि सिंह अजिबात चढत नाही. पण त्याला या गुणाची जरूरच कधी भासत नाही. तो इतका शक्तिशाली आणि तगडा असतो की पंजाच्या एकाच तडाख्यात रेडयाला लोळवतो. तुम्ही कदाचित पाहिले असेल की सिंहाने अगदी हलकेच पंजा मारला तरी जवळजवळ त्याच्या इतकेच वजन असलेली मादी जमिनीवर गडबडा लोळायला लागते.

तुम्ही जर प्राणिसंग्रहालयाच्या जवळपास कोठे रहात असाल तर रात्रीच्या वेळी आणि कधीकधी दिवसादेखील सिंहाच्या डरकाळया ऐकल्या असतील. वाघांपेक्षा सिंह अधिक गर्जना करतात. गुजरातमधील गीरच्या जंगलाजवळ जोवर तुम्ही राहात नाही तोवर तुम्हाला रानटी सिंह बघायला मिळणे कठीण आहे. कारण हे महान प्राणी भारतात जवळ जवळ संपुष्टात आले आहेत. पूर्वी उत्तर आणि मध्य भारतात सिंह विपुल होते. पण ते गुरांचा इतका फडशा पाडीत की त्यांची शिकार करून त्यांना ठार करण्यात आले आणि ते सहज शक्यही झाले. कारण सिंह दाट रानापेक्षा मोकळा मैदानी प्रदेश अधिक पसंत करतात. आफ्रिकेत मात्र अजूनही सिंहाचे एकछत्री राज्य आहे.


पूर्ण वाढ झालेल्या सिंहास खूप लांब केसांची, दाट, रखरखीत आयाळ असते. ती त्याची मान, खांदे आणि हनुवटीपासून लोंबत असते. सिंहीणीला आयाळ नसते. नर सिंहाला देखील वयाची तीन वर्षे पुरी होइ-पर्यंत ती येत नसते.

रानात असताना सिंह अतिशय क्रूर आणि हिंस्र असतो. त्यावरून कित्येक लोकांना वाटते की त्याच्या पिंजऱ्यात जाणाऱ्या माणसांना खूप धैर्य आणि साहस असावे लागत असेल. पण सिंह अगदी सहज माणसाळता येतो आणि थोडयाशा प्रयत्नाने त्याला शिकवता येते.

कित्येक सिंहांना माणसांबद्दल आपुलकी वाटू लागल्याची उदाहरणेही आहेत. पॅरिसच्या प्राणिसंग्रहालयातील दोन सिंहांना त्यांच्यावर देखरेख करणाऱ्या माणसाबद्दल इतके प्रेम वाटू लागले की तो आजारी पडला असता ते अतिशय खिन्न झाले आणि तो बरा होऊन परत आला तेव्हा आनंदाने अरोळ्या ठोकीत ते त्याच्यापाशी धावले व त्याचे हातपाय चाटू लागले.



गरवारे बालभव
पुणे



# मॅको

दक्षिण अमेरिका हे अनेक जातींच्या चित्र-विचित्र पक्ष्यांचे माहेरघर आहे. मॅको जातीचे मोठे पोपट देखील तेथेच आढळतात. ते दिसायला इतके रंगीबेरंगी आणि आकर्षक असतात की प्रत्येक प्राणिसंग्रहालयाला ते हवे असतात.

त्यांचा मोठा आकार, लांबलचक शेपूट आणि शोभिवंत विविध रंग यामुळे ते सर्वांचे लक्ष वेधून घेतात. जवळपास कुठे मॅको पक्षी असला तर तुमची दृष्टी तिकडे वळल्या-खेरीज राहाणार नाही. त्याच्या शरीराचा भडक शेंदरी रंग आणि त्याच्या पंखांचे व शेपटाचे लाल, पिवळे, निळे, हिरवे हे आकर्षक विविध रंग या सर्वांमुळे तो पोप-टांचा राजा शोभून दिसतो.

निळया व पिवळया रंगाचे, आणि लाल व निळया रंगाचे मॅको सर्वात अधिक लोक-प्रिय आहेत. या पक्ष्याची एकूण लांबी साधारणपणे चाळीस इंच असते. त्यापैकी शेपूटच जवळजवळ दोन फूट लांबीचे असते. पोपटांच्या जातीचे बरेच पक्षी हिरवेगार असतात. त्यामुळे ते रानात सहज लपून जातात. मॅकोंना मात्र अशा संरक्षक रंगाची गरज वाटत नाहीसे दिसते कारण एक तर ते फार उंचावरून उडू शकतात आणि दुसरे म्हणजे ते बहुधा झाडाच्या सर्वात वरच्या उंच शेंडयावर राहातात.


# मॅन्ड्रिल

बबून या मोठया वानराच्या जातीची असंख्य माकडे आहेत. पण त्या सर्वांमध्ये दिसण्यात आश्चर्यकारक बहुधा मॅन्ड्रिल वानरच आहे. ही स्वारी आफ्रिकेहून प्राणिसंग्रहालयात येते.

मॅन्ड्रिलच्या रूपामध्ये जणू इन्द्रधनुष्याचे सारे रंग एकवटल्यासारखे दिसतात. गंमत म्हणजे हे रंग दिसण्याची मुळीच अपेक्षा नसलेल्या जागी बहुधा ते आढळतात. तोंड किरमिजी रंगाचे असते. नाकाच्या दोन्ही बाजूला निळयाशार रंगाचे डाग असतात आणि नाक लाल भडक रंगाचे असते. दुसऱ्या टोकाला शेपटाच्या खाली आधुनिक चित्रकलेचा नमुना असल्यासारखे शेंदरी, किरमिजी आणि जांभळया रंगाचे शितोडे दिसतात. अंगावरच्या केसांचा रंग सामान्यत: तपकिरी हिरवा असतो आणि हनुवटी पिवळया रंगाच्या छोटया टोकदार दाढीने शृंगारलेली असते. ही देखणी रंग संगती फक्त नरालाच असते. मादीच्या बाबतीत तोंडावर काय ती निळसर रंगाची थोडीशी छटा असते. बाकी ती नराच्या तुलनेने दिसायला अगदीच भकास असते.

मॅन्ड्रिल हा त्याच्या देशात एक सर्वसामान्य प्राणी असला तरी त्याच्या विलक्षण ताकदीमुळे आणि धूर्तपणामुळे त्याला सहजासहजी पकडता येत नाही बहुधा छोटे मॅन्ड्रिलच पकडले जातात आणि त्यांना प्राणिसंग्रहालयातील जीवनाचा चांगला सराव होतो.

मॅन्ड्रिल उग्र असला तरी तो शाकाहारी आहे. इतकेच की अन्य वानरांप्रमाणे तो देखील वेळोवेळी आपल्या शाकाहारी भोजनात थोडयाफार मुंग्या नाही तर गोम टाकून ते चवदार बनवतो.



# पिसोरा




मांजर जसे वाघाचे अतिशय लहान रूप होय तसे पिसोर ही हरणाची छोटी प्रतिकृती होय. रानात त्याचा शोध लावणे फार अवघड काम आहे. म्हणून ते पाहाण्याची सुसंधी तुम्हाला प्राणिसंग्रहालयातच काय ती मिळू शकते. या लहानग्या प्राण्याची लांबी जेमतेम दीड फूट असते आणि उंची फार तर लहान कुत्र्या इतकी असते. त्याचे बहुतेक अवयव हरणांसारखेच असतात. फक्त त्याला सांबरासारखी शिंगे नसतात. त्याच्या वरच्या जबड्याच्या बाजूला डुकराच्या दातासारखा एक मोठा दात असतो.

या हरणाचे तोंड बरेचसे उंदरासारखे असते आणि त्याच्या छोट्या आकारामुळे नव्हे तर त्याच्या उंदरासारख्या तोंडामुळे तसेच त्याच्या भित्रेपणामुळे त्याला इंग्रजीत 'माऊस डीयर' म्हणतात. त्याचे दात तपकिरी डोळे खूप मोठे असतात. कानही मोठे असतात. पण खूप लांबलचक मात्र नसतात. त्याचे छोटेसे शेपूट बहुतेक अंगाला खेटून असते. तो आपल्या खरांच्या टोकावर चालतो आणि पावले इतकी अलगद टाकतो जणू

चालताना आवाज होण्याची त्याला भीती वाटत असावी. जरासे कुठे खुट्ट होताच तो एक पाय वर उचलून पळून जायच्या तयारीत उभा राहातो. दिवसभर तो खडकांच्या आडोशाला लपून राहातो आणि दिवस मावळताच लपत छपत खाद्य शोधायला बाहेर पडतो. तो इतका इटुकला असतो की अगदी लहान मांसाहारी पशूसुद्धा त्याचा सहज निकाल लावू शकतो. म्हणूनच कदाचित त्यांची संख्या फार थोडी असावी. पण त्यांना पाळणे अगदी सोपे आहे. आणि पाळीव प्राणी म्हणून ते दिसतीलही छान.



शहामृग



आज उपलब्ध असलेल्या पक्ष्यांत शहामृग हा सर्वात मोठा पक्षी होय. सामान्य माणसापेक्षा तो सरासरी दोन फूट जास्त उंच असतो. तो उडू शकत नसला तरी भक्कम लांब पायांमुळे तो जवळजवळ ताशी तीस मैल वेगाने धावू शकतो. ज्यावेळी त्याला शत्रूपासून दूर पळता येत नाही त्यावेळी तो पायांचा स्वतःच्या रक्षणासाठी उपयोग करतो. शहामृगाला फक्त दोन पाय असतात. डोके, मान आणि पाय बहुतेक उघडेच असतात. त्यावर पिसे नसतात.

शहामृगांचा मुख्य आहार असतो फळे, धान्य, पाने, कोवळे कोंब, गोगलगायी, आणि किडे. पोटात अन्न दळले जावे म्हणून ते खडे गिळतात आणि लोखंड, काच, कातडे व इतर कठीण वस्तूही मटकावतात. पूर्वी आफ्रिका आणि अरेबियात शहामृग सर्रास आढळायचे. पण हल्ली मात्र ते मध्य आफ्रिकेत किंवा दक्षिण आफ्रिकेच्या शेतजमिनीवरच काय ते आढळतात. तेथे पिसांसाठी त्यांची निगा राखतात.

शहामृगाचे अंडे खूप मोठे असते. कोंबडीच्या चोवीस अंडयांइतके त्याचे एक अंडे असते. आफ्रिकेतील आदिवासी त्या अंडयाच्या कवचांचा पाण्याची भांडी म्हणून उपयोग करतात. रात्री नर अंडी उबवतो आणि सकाळ संध्याकाळ मादी अंडी उबवते. दिवसा उन्हाच्या वेळी घरटे बहुधा उघडेच असते. तपकिरी पिसांमुळे मादी वाळलेल्या झाडासारखी भासते. त्यामुळे ती गवताळ प्रदेशात सहजासहजी दिसून येत नाही.



# पाणमांजर

पाणमांजरे बहुधा पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. यांचे मुख्य खाद्य मासे होय. ते पट्टीचे पोहणारे असतात. ते पाण्यात असताना बघायला मोठी गंमत वाटते.

तुम्ही जर पाणमांजराकडे नीट पाहिले तर तुम्हाला दिसेल की त्याच्या शरीराची रचना त्याच्या राहणीनुसार कशी सुरेख आहे. त्याचे शरीर लांब व अरूंद असते. तसेच ते चपटे देखील असते. त्यामुळे पाण्यावर सहज तरंगते. त्याला फूटभर लांबीचे चपटे शेपूट असते, अतिशय लहान कान असतात आणि आखूड पण मजबूत पाय असतात. पायांच्या पंजांना तीक्ष्ण नखे असतात. पंजांमध्ये कातडीचे पडदे असतात. त्यामुळे बदकाच्या पंजांसारखे जाळे तेथे तयार होते. हे जाळीदार बोटे असलेले पाय नावेच्या वल्हयांसारखे उपयोगी पडतात आणि त्यांच्यामुळे पाणमाजराला पाण्यातून सुळकन् पोहता येते.

प्राणमांजराचे वैशिष्टय म्हणजे त्याला आपल्या नाकपुडया आणि कानांचे पडदे वाटेल तेव्हा बंद करता येतात. त्यामुळे त्याला पाण्याखाली काही वेळ सहज राहाता येते. मासे पकडण्याच्या कामी या युक्तीचा खप उपयोग होतो.

पाणमांजरे बहुधा पाच किंवा सहा जणांचे टोळके करून राहातात. आई, वडील आणि छोटी बाळे.

ते ज्यावेळी मासे धरीत नसतात किंवा खेळत नसतात त्यावेळी जमिनीतील बिळांमध्ये राहातात.. ते गोंगाट करणारे खेळकर




प्राणी आहेत. डोंगर उतरणीवरून घसरगुंडी करायला त्यांना अतिशय आवडते. चिखलाच्या किंवा बर्फाच्या उतरणीवरून एका पाठोपाठ एक घसरताना ते दिसतात. पाणमांजरे मुख्यत: रात्री मासे पकडतात आणि बहुधा त्यांच्यापैकी कित्येकजण एकत्र जमून, एकमेकांकडे मासे ढकलीत मासे पकडतात.


भारतातील काही भागात कोळी लोकांच्या मदतीसाठी पाणमांजरे पाळतात. लहान असतानाच पकडलेल्या पाणमांजरांना पाळणे सोपे असते आणि पाळीव पाणमांजर



कुत्र्याप्रमाणे मालकाच्या मागे मागे हिंडायला शिकते. कोळी लोक मासे जाळ्याकडे हाकलण्याच्या कामी पाळीव पाणमांजराचा उपयोग करतात.

अमेरिकेच्या उत्तरेकडील प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर सागरी पाणमांजरेही आहेत. पण आपल्याला ठाऊक असलेली पाणमांजरे ताज्या गोड्या पाण्याची आहेत. ती नद्यांमध्ये वा सरोवरांमध्ये राहातात. पाणमांजरांचे केस दाट आणि सुरेख असतात. उन्हाळयात ते बहुधा काळे असतात. पण हिवाळयात मात्र त्यांचा रंग लालसर भुरा होतो.





# गेंडा

पृथ्वीच्या पाठीवर अजूनही अनेक जातीचे गेंडे अस्तित्वात असले तरी हळूहळू त्यांचे उच्चाटण होत आहे. त्यास मुख्य कारण म्हणजे माणसाची लालसा होय. आफ्रिकन हत्तीच्या हस्तिदंताला, आशियातील वाघाच्या कातडयाला आणि गेंडयाच्या शिंगाला जी वारेमाप किंमत मिळते त्यामुळे हे प्राणी भयंकर संकटात सापडले. प्राणिसंग्रहालय हेच गेंडयाचे अखेरचे आश्रयस्थान होय.

गेंडयासाठी असलेला इंग्रजी शब्द 'ह्रिनोसेरोस' हा मूळ ग्रीक शब्द असून त्याचा अर्थ नाकावरील शिंग असा आहे. या प्राण्याच्या नाकाच्या टोकावर असलेल्या मोठया शिंगामुळेच त्याला हे नाव पडले. आपल्या या शिंगाचा उपयोग गेंडा स्वतःच्या रक्षणासाठी करतो नाहीतर ज्या झाडाच्या वा झुडुपाच्या पानाफळांवर तो उदरनिर्वाह करतो ते समूळ उपटून काढण्याच्या कामी तो शिंग वापरतो. गेंडा तसा स्वभावाने मवाळ असतो. पण जखमी झाल्यास मात्र त्याच्या इतका घातक शत्रू नाही. त्याचे शिंग लहान असले तरी मोठे भयंकर शस्त्र असते. या शिंगात औषधी गुण असल्याचा समज आहे.

गेंडयाचे कातडे फारच जाड आणि चिवट असते. बंदुकीच्या गोळीचाही परिणाम न होणारे म्हणा ना! त्याची दृष्टी मात्र त्या मानाने वाईट असते. त्याच्या सरळ नाकासमोर असलेल्या वस्तू तो पाहू शकत नाही. पण त्याचे कान आणि नाक फार तिखट असतात. त्यामुळेच त्याला येऊ घातलेल्या संकटाचा सुगावा लागून तो सावध होतो.

या अगडबब प्राण्याच्या खांद्याच्या मागे पुढे आणि मांडीच्या पुढच्या भागावर कातडीच्या वजनदार घडया पडलेल्या असतात. त्या घडया मोठमोठया ढालीसारख्या दिसतात. विचित्र आकार, लांब नावेसारखे डोके, ढालीच्या घडया, आणि चिलखतासारखे कातडे या सर्वांमुळे गेंडा कोणत्या तरी गतकाळातील राक्षसासारखा वाटतो

# वाघ

"जर तुम्हाला वाघ भेटला तर त्याला मामा म्हणा म्हणजे तो तुम्हाला मुकाटयाने जाऊ देईल" अशी एक म्हण भारताच्या काही भागात प्रचलित आहे. पण या भव्य आणि भीतिदायक मामांची गाठ पडायची संधी दरवर्षी कमी कमीच होत चालली आहे. कारण त्यांची संख्या खालावत चालली आहे.


आफ्रिकेतील जंगलांवर जसे सिंहाचे एकछत्री राज्य आहे तसेच भारतीय जंगलांवर वाघाचे एकाधिपत्य आहे. सिंहाशी आकार आणि ताकद या बाबतीत तुलना करू शकेल असा एकच प्राणी आहे आणि तो म्हणजे वाघ ! इतकेच नव्हे तर सौष्ठवपूर्ण बांधा आणि डौलदार चाल या बाबतीत तो सिंहापेक्षाही वरचढ आहे.

वाघ सामान्यतः मोकळयावर राहातात. दिवसा ते उंच गवतात विश्रांती घेत पडून राहातात. दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयाच्या अधिकाऱ्यांनी वाघाच्या सुखसोयीकडे बरेच लक्ष पुरविल्याचे दिसते. त्यांनी वाघांसाठी खडकाळ, गवताच्छादित जागेची व्यवस्था केली असून, जलविहारासाठी भरपूर पाण्याचीही सोय केली आहे. मनीच्या जातीचे बहुतेक प्राणी पाण्याजवळ जायचे टाळतात. पण वाघांना मात्र जलक्रीडा आवडते आणि त्यांना मस्तपैकी पोहताही येते.

अन्न आणि निवारा पुरवणारी जंगले जोवर आहेत तोवरच वाघ हा भारतीय जंगलांचा राजा राहील. पण लोकसंख्येच्या वाढीबरोबर जंगलांचा विनाश होत चालला आहे आणि वाघासारखे प्राणी निर्वासित होऊन त्यांची सहज हत्त्या करण्यात येत आहे. वाघाच्या कातडयाला मिळणाऱ्या भरमसाट किमतीमुळे देखील त्यांची मोठया प्रमाणावर शिकार होत आहे. हल्ली वाघाची शिकार बेकायदेशीर ठरविण्यात आली आहे. यावरून जंगलांमध्ये या राजेशाही श्वापदाचे अस्तित्व टिकून राहील अशी आशा करायला हरकत नाही. अर्थात त्यासाठी राखीव जंगलेही ठेवावी लागतील हे सांगायला नकोच.








# कासव

कासवाचे दोन प्रकार आहेत. एक जमिनीवर राहाणारे कासव आणि दुसरे पाण्यात राहाणारे कासव. पाण्यात राहाणाऱ्या कासवांच्याही पुन्हा दोन उपजाती आहेत. एका जातीचे समुद्राच्या खाऱ्या पाण्यात राहातात तर दुसऱ्या जातीचे ताज्या गोडया पाण्यात राहातात. पण त्यामुळे तुमचा गोंधळ उडण्याचे काही कारण नाही. ते सर्व सरपटणाऱ्या आणि अस्थिमय कवच असणाऱ्या प्राण्यांच्याच जातीचे आहेत. त्यांना काही खायचे असले तेव्हा आपली तोंडे ते त्या ढालीसारख्या कवचाबाहेर काढतात आणि चालायचे असेल तेव्हा पाय बाहेर काढतात. धोका दिसताच ते संरक्षणासाठी हात, पाय, तोंड पुन्हा आत ओढून घेतात. उष्ण प्रदेशात ते राहातात. खायला त्यांना पालाबिला, किडे वगैरे चालतात. पण मासे ते विशेष चवीने खातात.

कासवे दीर्घायुष्यी असतात. नेपोलियन ज्या सेंट हेलेना बेटावर कैदेत होता (इ. स. 1815 ते 1821) तेथे एक अजस्र कासव अजूनही हयात आहे. दुसरे एक विशाल कासव ते काही वर्षांचे असतानाच 1966 साली मॅरिशस बेटावर नेण्यात आले होते. ते 1918 साली म्हणजे 152 वर्षांहून अधिक वयाचे होऊन मेले. प्राणिसंग्रहालयांतून किंवा



बागांमधून ठेवण्यात आलेल्या इतर काही कासवांनी केव्हाच शंभरी ओलांडली आहे.

गॅलापॅगोस बेटावरील कासवाची पाठ साधारणपणे चार फूट लांब आणि सुमारे 600 पौंड वजनाची असते. सर्वात मोठे सागरी कासव जवळ-जवळ आठ फूट लांबीचे असते. त्याचे वजन सुमारे एक टन असते.

भारतीय नद्यांतून पाण्यातील कासवे भरपूर आढळतात. ही कासवे साधारणतः दोन फूट लांबी रुंदीची असतात. पण त्यांचे शरीर काहीसे चपटे असते. आपल्या आखूड, बळकट पायांची जोरदार हालचाल करीत ते पाण्यातून पोहतात. श्वास घ्यायला ते जेव्हा पाण्याच्या पृष्ठभागावर येतात तेव्हा त्यांची मान आणि तोंड फक्त पाण्याबाहेर निघते. डोके पाण्यावर असताना भूरकट हिरव्या सापासारखे काहीसे दिसते.

भारतात कासवांचे सोळा फूट लांबीचे अवशेष सापडले आहेत. ते जेव्हा जिवंत असतील तेव्हा किती भयंकर दिसत असतील नाही का ?

जमिनीवरच्या वा पाण्यातल्या कोणत्याच कासवाला दात नसतात. त्यांचा जबडा एक प्रकारच्या शिंगाने झाकलेला असतो. म्हणून त्यांची तोंडे काहीशी चोचीसारखी असतात. पोपटासारखाच ते ही चावा घेतात आणि त्यांच्यापैकी काही तर विशेषत: अमेरिकन चावरी कासवे तर भयंकर लचकाच तोडतात.



# जाळीदार पंजांचे पक्षी



करकोचा हा पाण्यात चालणारा पक्षी आहे. काकाकुवा आणि टॅंको हे झाडावरचे पक्षी आहेत तर किवी आणि शहामृग हे जमिनीवर धावणारे पक्षी आहेत. आता आपण कातडी पडद्यांनी ज्याच्या पायांची बोटे जोडलेली असतात अशा पक्ष्यांचा विचार करू या. यात आपल्या ओळखीचे मुख्य पक्षी म्हणजे बदक, हंस आणि राजहंस हे होत. हे बहुतेक वेळ तलावात आणि सरोवरात क्रीडा करीत असतात. त्यामुळं तेथे यांचे निवांतपणे निरीक्षण करता येते.

बदक आणि हंस यांच्या असंख्य जाती जगभर विखुरलेल्या आहेत. त्यांच्यापैकी काहींना अतिशय सुरेख पिसे असतात. आशि




यातील काही प्रेक्षणीय रंगाची बदके ब्रिटन आणि युरोपातील खास शोभेच्या तलावांमध्ये विहरत असल्याचे पहावयास मिळते. तेथे ते बहुतेक रानातल्या पक्ष्यांसारखे नैसर्गिक वातावरणात राहातात.

हंस देखणे आणि डौलदार पक्षी आहेत. त्यांच्या अंगीही भरपूर बळ असते. लहान बाळे त्यांच्या बरोबर असली म्हणजे आपण त्यांना शक्य तितके टाळावे हे उत्तम! हंसाच्या पंखांत इतका जोम असतो की त्यांच्या एका फटकाऱ्यासरशी तो कुत्र्याला वाटेला लावू शकतो किंवा माणसाची तंगडी तोडू शकतो. म्हणून हंसाच्या घरट्यापाशी न जाणे हेच हिताचे! ब्रिटनमध्ये हंसांना "राजपक्षी" म्हणत असत. कारण त्यांच्याकडील प्रथेप्रमाणे सर्व हंस पक्षी राजाचे किंवा ज्यांना तो देईल त्यांचे असत. आजसुद्धा टेम्स नदीवरील सर्व हंस राणीच्या मालकीचे समजले जातात.

या जाळीदार पंजांच्या पक्ष्यांमधला सर्वांत उंच पक्षी म्हणजे रोहित (फ्लेमिंगो) हा होय. त्याची उंची जवळ जवळ माणसा-इतकी असते. त्याचा आकार काहीसा विचित्र असला तरी रंग मोठा सुरेख असतो. नराचे पंख भडक गुलाबी रंगाचे असतात. भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या उष्ण प्रदेशात हे पक्षी आढळतात. स्पेन मधील पाणथळ प्रदेशात ते 300 ते 500च्या कळपाने राहातात आकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर आपले हजारो किरमिजी पंख पसरून या पक्ष्यांचा थवा जेव्हा एकत्र उडतो तेव्हा ते मोठे अविस्मरणीय दृश्य असते. त्याहून अन्य सुंदर दृश्य दिसणे कठीण!

रोहिताच्या सहवासात कधी कधी पाण-कोळी आढळतो. हा देखील सुंदर पिसारा असलेला मोठा व विलक्षण पक्षी होय. त्याचे पिसे पांढरीशुभ्र असून त्याला गुलाबी छटा असते. लांबलचक गळ्याशी मात्र ती सोनेरी पिवळी असतात. त्याची चोचही लालसर पिवळी अशी असते. त्याखाली एक मोठी थैली लोंबत असते. पकडलेले मासे खाण्याची इच्छा होईपर्यंत पाणकोळी ते मासे या पिश-वीत साठवून ठेवतो.



# रानटी गाढव

मूर्ख माणसाला गाढव म्हणून संबोधणे हा वस्तुत: गाढवाचा अपमान आहे. कारण हा प्राणी रानटी असो नाहीतर पाळीव असो अतिशय बुद्धिमान प्राण्यापकी एक आहे. पाळलेले गाढव घोडया इतकीच प्रेमाला प्रतिसाद देते आणि घोडया इतकेच व्यवहार-ज्ञान त्यालाही असते. रानटी गाढव मात्र बुजरे आणि हळवे असते.

रानटी गाढवे ही भारताच्या वायव्य भागात आणि पाकिस्तानात आढळतात. पण त्यांचीही संख्या खूपच रोडावलेली आहे ही मुख्यत: गुजरातमधील कच्छच्या छोटया रणात, हजार चौरस मलांच्या खाऱ्या गाळ-साळाच्या पडीत प्रदेशात आढळतात. भारता-तील वन्य प्राणी संरक्षक मंडळाने त्यांना संरक्षण दिले असून दुर्मिळ प्राण्यांच्या यादीत त्यांचा समावेश केलेला आहे. सीरिया आणि पर्शियात एके काळी रानटी गाढवे बहुसंख्येने सापडायची. पण तेथून त्यांचे उच्चाटण झाल्याचे दिसते.

रानटी गाढव अतिशय वेगात धावू शकते. त्याची दौड इतकी द्रुत असते की अरेबियन घोडयांचा तांडा देखील त्याला हरवू शकत नाही. पण त्याची ही गतीच त्याला मारक ठरली. चित्त्याप्रमाणेच ते देखील पाठलागाचे एक आवडते साधन बनले. पर्शियात तर बडे लोक त्याची शिकार करीत. या विभागातून हा प्राणी नाहीसा होण्याच्या अनेक कारणांपैकी तेही एक कारण होय.

कच्छच्या रणातील लोक या रानटी गाढवांची शिकार करीत नाहीत की त्यांना इजा पोचवीत नाहीत. काही रानटी गाढवे तर चरता चरता रणाच्या पूर्व टोकाकडून भारत व पाकिस्तानच्या सीमारेषा ओलांडून जातात. दोन्ही बाजूंकडे हाती लागण्यासारखे जे काही उत्कृष्ट असेल त्यावर ते ताव मारतात.

रानटी गाढवे सुमारे चार फूट उंचीची, मजबूत बांध्याची असतात. इजिप्शीयन गाढवांचे वंशज असलेल्या पाळीव गाढवांपेक्षा ती मोठी असतात. त्यांचा रंग गडद करडा असून दाट लालसर काळी आयाळ त्याला असते. झेब्रांसारखे त्यांचे कान लहान अस-तात. ते कळप करून राहातात. प्रत्येक कळप एका पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली असतो. त्याला कळपाच्या भल्याची जाणीव असते. तो मोठया हुकमीपणाने आणि जबाबदारीने अंमल गाजवतो.



# झेब्रा

बिचारा झेब्रा ! त्याच्या नावाचे आद्याक्षर 'झेड'. इंग्रजी वर्णमालेतला शेवटचा वर्ण. त्यामुळे वर्णमालेचे पुस्तक असो, शब्दकोश असो, नाहीतर ज्ञानकोश असो. याची जागा मात्र नेहमी शेवटच्या बाजूला वा शेवटी असते. पण प्राणिसंग्रहालयाला भेट देणाऱ्या पाहुण्यांमध्ये मात्र तो इतका लोकप्रिय असतो की त्यालाच बहुधा पहिला मान मिळतो. त्याच्या ठसठशीतपणामुळे कदाचित ते असावे.

आकाराच्या दृष्टीने घोडयापेक्षा गाढवाशी त्याचे जवळचे नाते दिसते. टोकाला झुबकेदार शेपूट त्याला असते. ताठ केसांची आयाळ असते. त्याचे मुख्य आकर्षण म्हणजे त्याची कातडी होय. तिचा रंग सामान्यपणे फिक्कट पिवळा असतो आणि त्यावर सर्वत्र मखमली काळया रंगाचे चट्टेपट्टे असतात. झेब्रा दक्षिण आफ्रिकेत, मुख्यत: केप ऑफ गुड होपच्या जवळील डोंगराळ विभागात आढळतो. तो अतिशय दमदार, चपळ आणि खंबीर चालीचा असतो. टेकडी आणि कातळ तो बकऱ्याच्या चपलतेने उडया मारीत सहज ओलांडू शकतो. त्याला जर माणसाळता आले तर घोडया सारखाच तोही उपयुक्त प्राणी ठरेल. पण त्याची उद्दाम वृत्ती मुठीत करणे कठीण आहे. प्राणिसंग्रहालयातील झेब्र्याला मोकळेपणाने हिंडता फिरता यावे म्हणून भरपूर मोकळी जागा द्यायला हवी.


झेब्रा बहुधा कळप करून राहातात आणि डोंगर उतरणीवर सर्वजण चरत असताना त्यांच्यापैकी एक जण सतत पहारेकऱ्याप्रमाणे राखण करीत असतो. माणसांनी किंवा इतर प्राण्यांनी हल्ला केला म्हणजे ते आतल्या बाजूला तोंडे करून वर्तुळाकार उभे राहातात आणि दुगाण्या झाडून शत्रूला पळवून लावतात.

Printed at J. J. Offset Printers, Wazirpur, Delhi-35









रु. 8.00

ISBN 81-237-2704-6

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया